(३५७)

(५६)

नुतन वर्षाभिनंदन

क्रमांक : ना.भू. २ / स्वयंसूची धारीका / २००२
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय,
शासकीय बंगला नं.८
जेल रोड, येरवडा, पुणे -६
☏ ६६९६३९४
पुणे, दिनांक :- १/१/२००२

# -: परिपत्रक :-

विषय :- स्वयंसूची धारीका अद्यावत ठेवणे व त्यांची निंदणी करणे बाबत.

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांनी नगर भूमापन अधिकारी, सातारा यांचे कार्यालयास दिनांक ३०.१२.२००१ रोजी भेट दिलेली आहे. त्या भेटीचे वेळी त्यांनी त्या कार्यालयात ठेवणेत आलेल्या स्वयंसूची धारीकांची पाहणी केली व त्या अद्यावत करणे / निंदणी बाबत परिपत्रकाव्दारे सूचना देणेस उपसंचालक भूमि अभिलेख यांना सूचित केल्याने इकडून खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,(म.राज्य) पुणे यांचेकडील क्रमांक एस.व्ही. सी.आर. २६४५/ स-३/ ९४, पुणे दिनांक १२.१२.९४ रोजीचे परिपत्रकामध्ये स्वयंसूची धारीका १०० - १०० च्या गठ्यात बांधून ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापि स्वयंसूची धारीकांचे गठ्ठे मोठे होत असलेस त्या ५० - ५० च्या गठ्यात बांधून कापडी बस्त्यात सुरक्षित ठेवाव्यात. प्रत्येक स्वयंसूची धारीकेस जॉकेट फॉर्म लावून त्यातील सर्व रकाने व्यवस्थित भरावेत. तसेच धारीकेस पानांक देवून परिरक्षण भूमापक / निमतानदार यांनी जॉकेट फार्मवर दिनांकित स्वाक्षरी करावी. तसेच संबंधीत नगर भूमापन क्रमांकाबाबत हवाल्याचा दाखलाही नगर भूमापन क्रमांकाप्रमाणे त्या धारीकेत ठेवावा, म्हणजे धारीका सापडणे सोपे जाईल.

नगर भूमापन नियम पुस्तिकेतील परिच्छेद १५३ मध्ये स्वयंसूची धारीका अद्यावत ठेवणेकामी सविस्तर व स्वयंस्ष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्या बारकाईने अवलोकन कराव्यात.

अर्जदारांचा फेरफार नोंदी बाबतचा अर्ज.

१) अर्जदारांनी नोंदी बाबत दिलेले पुराव्याचे कागदपत्र उदा. दुय्यम निंबंधक यांचेकडील सूची क्रमांक २, मयत असल्यास मयताचा मूळ दाखला, मृत्यूपत्र, वाटणीपत्र , बक्षिसपत्र, कोर्ट निकाल, धर्मादाय आयुक्त यांचेकडील निकालपत्र, गहाण खत , अपील निर्णय वगैरे .
२) अर्जदार व हित संबंधीतांचे राजपत्रित अधिकाऱ्या समोर झालेले जबाब.

३) नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचा दप्तरी आदेश.

४) नमुना नंबर ९ च्या नोटीसीची स्थळ प्रत व त्या बजावल्याबाबतचे कागदपत्र/ पोस्टाचे दाखले/ पोंच.

५) अर्जदार यांना दिलेले निकाली उत्तर.

नोंद विवादग्रस्त झालेली असेल अशावेळी -

(१) विवादग्रस्त हरकत अर्जदार यांचा अर्ज व त्यांना कार्यालयाने दिलेली पोंच.

(२) त्यांनी जोडलेले पुराव्याचे कागदपत्र.

(३) हरकत अर्जदार, मूळ अर्जदार व इतर संबंधीतांचे घेतलेले जबाब व त्यांनी त्यावेळी सादर केलेली पुराव्याची कागदपत्रे.

(४) त्याकामी नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी दिलेला निर्णय.

(५) अर्जदार यांना दिलेले निकाली उत्तर.

६) कार्यालय प्रमुखांनी स्वयंसूची धारीकेतील कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना वरील खेरीज अन्य काही महत्वाची कागदपत्रे स्वयंसूची धारीकेत ठेवणे क्रमप्राप्त वाटत असल्यास त्याबाबत त्यांनी जाणीव पूर्वक निर्णय घेवून ती कागदपत्रे स्वयंसूची धारीकेत ठेवावीत जेणे करून भविष्यात अडचण उद्‌भवणार नाही.

वरील प्रमाणे महत्वाची कागदपत्रे जतन करून ठेवावित इतर दुय्यम व अनावश्यक कागदपत्रे कटाक्षाने काढून टाकावित. त्यांची नाशाच्या नोंदवहीत रीतसर नोंद घेवून ती विहित कार्यप्रणालीनुसार नाशात काढावीत.

नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी स्वयंसूची धारीका अद्यावत आणताना पूर्वीचे फेरफार नोंदीचे कागदपत्र संबंधित स्वयंसूची धारीकेत सामील झालेले आहेत याची खात्री करावी व नंतरच नोंद मंजूरीची कार्यवाही करावी. तसेच फेरफार नोंद मंजूर होताच तीहि कागदपत्रे स्वयंसूची धारीकेत समाविष्ठ करून त्यांना पानांक देवून जॉकेट फार्म अद्यावत भरून घ्यावेत व परिरक्षण भूमापक / निमतानदार यांना जॉकेट फार्मवर सही करणेस सांगावे.

वरील प्रमाणे स्वयंसूची धारीका नमुन्यात ठेवले नंतर बस्त्यांवर ठळक अक्षरात पेठेचे / गांवाचे नांव व स्वयंसूची धारीकेचे नगर भूमापन क्रमांक नमूद करावेत.

उदा.:- 'स्वयंसूची धारीका'
पेठ/ गांव :- ............
नगर भूमापन क्रमांक ...... ते ........

स्वयंसूची धारीका ह्या ''ब'' अभिलेख असल्याने त्या ३० वर्षे जतन करून ठेवाव्या लागतात. त्यात वरील प्रमाणे कार्यवाही करून त्यांच्या निंदणीकरण/ पृथक्करणाचे (Sorting) काम करणेचे आहे.

वरील परिपत्रकाप्रमाणे सर्व नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / शिरस्तेदार/ वरीष्ठ लिपीक / परिरक्षण भूमापक / निमतानदार यांनी

(३५१)

काटेकोरपणे अंमल बजावणी करणेची आहे. तसेच नियंत्रण अधिकारी यांनीही सदर परिपत्रकाची अंमल बजावणी केली जाते किंवा नाही याची पडताळणी त्यांचे दौऱ्याचे वेळी / निरीक्षण ज्ञाप काढणेचे वेळी करणेची आहे. वरील प्रमाणे कार्यवाही करून आपले अहवाल दिनांक २५.२.२००२ पूर्वी सादर करावे.

9/1/2009

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.

प्रत :- सर्व नगर भूमापन अधिकारी / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / विशेष तालुका निरीक्षक भूमि अभिलेख (गां).

प्रत :- अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर.

प्रत :- मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.